# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २८१ - २३ दिनांक : - २३/०८/२०२३

## आंतरराज्यीय घरफोडी चोरी, जबरी चोरी करणा-या आरोपीतांना अटक करण्यात गुन्हे शाखा कक्ष -3 यांना यश.

दिनांक ०६/०८/२०२३ रोजी रात्रौ २३.०० ते दि ०७/०८/२०२३ रोजी पहाटे ०५.०० वाजताचे दरम्यान फिर्यादी श्री रामकुमार श्रीबसंत सिंग याचे, भागवत टेकडी बबलु चौधरी यांचे घराजवळ धानिवबाग नालासोपारा पुर्व या राहते घरात अज्ञात इसमाने कशाचेतरी सहायाने घराचा पत्रा उचकटुन प्रवेश करुन लबाडीच्या इराद्याने स्वःताच्या फायदयाकरीता सोन्याचे दागीने, रोख रक्कम व मोबाईल फोन असा ६०,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल फिर्यादीचे संमतीशिवाय चोरी करुन नेल्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ७३१/२०२३ भा.द.वि.सं कलम ३८०,४५७ प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

मिरा भाईदर वसई विरार पोलीस आयुक्तालय परिसरात गेल्या काही महिण्यापासुन घरफोडी चोरी, जबरी चोरीच्या प्रकारात वाढ झाल्याने सदर घटनांची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन पायबंद करणे बाबत सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व आदेशान्वये सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना तांत्रीक विश्लेषण व आरोपीत बाबत मिळालेल्या गोपणीय बातमीवरुन आरोपीत नामे - १) कय्युम झाकीर शेख वय - २० वर्षे, रा. धानिव बाग, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर. २) लाला अझर शेख वय १९ वर्षे, रा. धानिव बाग, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर. ३) मरिप्पा मुकुंद गजदाने वय १९ वर्षे, धानिव बाग, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर यांना दिनांक २२/०८/२०२३ रोजी ताब्यात घेवुन त्यांचेकडे तपास केला असता त्यांनी सदर गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्यांना सदर गुन्हात अटक केली असुन,त्यांचेकडे अधिक तपास केला असता त्यांचे कडुन विविध गुन्हयातील ७५,५००/- रुपये किंमतीचे मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन त्यांचे कडे प्राथमीक तपास करता एकुण ६ गुन्हे उघडकीस आले आहेत.

**- उघडकीस आलेले गुन्हे -**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर कलम |
|---|---|---|
| १ | पेल्हार पोलीस ठाणे | ७३१/२०२३ भा.द.वी.सं. कलम ४५७, ३८० प्रमाणे |
| २ | पेल्हार पोलीस ठाणे | १७९/२०२३ भा.द.वी.सं. कलम ३९२ प्रमाणे |
| ३ | वालीव पोलीस ठाणे | १९६/२०२३ भा.द.वी.सं. कलम ४५७,३८० प्रमाणे |
| ४ | चौतुपल्ल पोलीस ठाणे (तेलंगणा राज्य) | ४११/२०२३ भा.द.वी.सं कलम ४५७,३८० प्रमाणे |
| ५ | चौतुपल्ल पोलीस ठाणे (तेलंगणा राज्य) | ४१२/२०२३ भा.द.वी.सं कलम ४५७,३८० प्रमाणे |
| ६ | चौतुपल्ल पोलीस ठाणे (तेलंगणा राज्य) | ४१५/२०२३ भा.द.वी.सं कलम ४५७,३८० प्रमाणे |

नमुद आरोपीत यांचा पुर्व इतिहास पडताळुन पाहता उक्त आरोपीत विरुध्द अशाच प्रकारे मिरा भाईंदर- वसई विरार आयुक्तालय व पालघर येथे १० पेक्षा जास्त घरफोडीचे गुन्हे नोंद आहेत.

वरील कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो., (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा.पोलीस आयुक्त सो., (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.उप.निरी. अभिजित टेलर, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं. राकेश पवार, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे म.सु.ब. सागर सोनवणे, गणेश यादव, प्रविण वानखेडे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष -३ तसेच स.फौ. संतोष चव्हाण नेम सायबर सेल यांनी पार पाडली आहे.

********